जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी
<u>मागासवर्गीयांवर करावयाचा १५ टक्के खर्च</u>

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक:मागास ११८७/सीआर १८/ ३४
मंत्रालय, मुंबई-४०००३२, दिनांक: ४ फेब्रुवारी १९८८

संदर्भ: शासन परिपत्रक, क्र. मागास ११८५/सीआर ५७२४/३४, दि. ३.१२.८५ कृपया पहावे.

शासन निर्णय: महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १०० [६] अनुसार मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी आपल्या उत्पन्नातून कार्यक्रम आखून ते पार पाडण्याची वैधानिक जबाबदारी या पंचायती राज संस्थांवर आहे. या संदर्भात जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी स्वत:च्या उत्पन्नातून कमीत कमी १५% रक्कम अनुसूचित जाती/जमातीच्या उन्नतीसाठी विशेष विकासाच्या कामाच्या योजना आखून त्या पार पाडण्यासाठी खर्च करावी, असे जिल्हा परिषदांना वारंवार कळविले असून त्यासंबंधी कार्यपध्दतीचे वरील परिपत्रान्वये मार्गदर्शनही करण्यात आले आहे.

२. तथापी शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याचशा जिल्हा परिषदा त्यांच्या उत्पन्नाच्या १५% रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणार्थ खर्च करीत नाहीत व हीच बाब विधान मंडळाच्या अनुसूचित कल्याण समितीच्या तसेच शासनाच्या निदर्शनास आली आहे.

३. तेव्हा आता शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. की :-

अ] अनुसूचित जमाती/जाती/जनजाती यांच्या कल्याणार्थ जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाच्या १५% रक्कम ही योग्य त-हेने व त्याच आर्थिक वर्षात खर्च होते की हे पाहण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असून रक्कम खर्ची न पडल्यास त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरले जाईल.

ब] जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण समितीने सुध्दा याबाबत पाठपुरावा करुन १५% रक्कमेची तरतूद करुन घ्यावी व ती रक्कम त्याचवर्षी खर्ची पडेल असे पहावे.

क] महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

[बा. वि. कामत]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [मुंबई वगळून]